# किरण वसंत पुरंदरे

जन्मतारीखः १७.०३.१९६१ जन्मगावः कल्याण (ठाणे जिल्हा) शिक्षणः बी.कॉम.

- निसर्गाची, विशेषतः पक्ष्यांची जन्मजात आवड. नैसर्गिक पक्षीनिरीक्षक. (म्हणजे पक्षिनिरीक्षणाचं कोणतंही औपचारिक शिक्षण घेतलेलं नाही.)
- गेली ४२ वर्षं निसर्गाचा विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक, रक्षक, शिक्षक, प्रेरक आणि लेखक.
- दि. २९.०८.२०१९ पासून राहते पुणे शहर सोडून भंडारा जिल्ह्यातील पिटेझरी या गावात घर बांधून सपत्नीक राहात आहे.
- स्थानिक गोंड लोकांच्या सहकार्यानं निसर्ग संरक्षण आणि संवर्धन क्षेत्रात विविध प्रकल्प तडीस नेले आहेत. सुंदर जगाच्या निर्मितीचा ध्यास घेतला आहे.
- निसर्गाचा अभ्यास, जतन आणि संवर्धन याला अवघं आयुष्य वाहिलेलं आहे.
- नैसर्गिक पाणवठ्यांचं जतन, संवर्धन आणि संशोधन यात विशेष रूचि.
- भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांमधील नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात सलग ४०० दिवस एकट्यानं मुक्काम करून जीविधतेचा (Biodiversity) अभ्यास आणि लेखन.
- निसर्गाची गोडी लागावी म्हणून लहान मुलांशी संवाद साधून त्यांना बांधून ठेवण्याची कला अवगत.
- पक्षी, प्राणी, जीविधता या विषयांवर १९ पुस्तकं प्रकाशित. ‘आभाळवाटांचे प्रवासी’ या पुस्तकाला १९९२ चा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती राज्य पुरस्कार. ‘सखा नागझिरा’ या ग्रंथाला २००७ चा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती (भाई माधवराव बागल) राज्य पुरस्कार. याच ग्रंथाला २००७ चे महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे चे शि.म. परांजपे स्मृतिप्रीत्यर्थ (ललितेतर वैचारिक) पारितोषिक.
- निसर्गाच्या अभ्यासाच्या निमित्तानं इंग्लंड, नेपाळ, श्रीलंका, केनिया, टांझानिया, थायलंड, न्यूझीलंड या देशांना भेटी.
- महाराष्ट्रात आणि इतर राज्यांमध्ये निसर्गसंमत पाणवठ्यांची निर्मिती.
- अनेक निसर्ग कवितांचं (अप्रकाशित) लेखन. कविता लेखनाची आवड.
- महाराष्ट्र शासनातर्फे पुणे जिल्ह्यासाठी मानद वन्यजीवन रक्षक म्हणून नेमणूक.
- कोणत्याही कृत्रिम साधनाचा वापर न करता भारतातील सुमारे ८० पक्ष्यांच्या आवाजांच्या नकला करून त्यातील काही पक्ष्यांचा नैसर्गिक अधिवासात प्रतिसाद मिळवण्याची शुकसष्टिकाप्रलापनकला अवगत.
- ‘अभिमानास्पद महाराष्ट्र’ या लघु चित्रपट निर्मिती मालिकेसाठी पिटेझरी प्रकल्पाची निवड.
- पुणे महानगरपालिकेचा ‘शिवाई’ तसंच किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातर्फे ‘वसुंधरा–मित्र’ असे अनेक पुर स्कार प्राप्त.
- ‘रानगुंफी’ या मराठीतील एकमेव एकपात्री प्रयोगाचे अनेक प्रयोग सादर.